NDVSY fund 2016-17

जिल्हा नियोजन समिती, मुंबई शहर

जिल्हाधिकारी कार्यालय

ओल्ड कस्टम हाऊस, तिसरा मजला, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी व फॅक्स क्रमांक - २२६६०१६७ dpomumbaicity@gmail.com


क्र.जिनिस/टे-३/नादवसुयो/प्रमंआ/२०१६-१७/ **१३** /२०१७

दिनांक : ०४ /०१/२०१७

## नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत घेण्यात येणा-या कामांना प्रशासकीय मंजूरी आदेश -२०१६-१७

**वाचा:** १) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. विघयो-१०२०००/१५१२/प्र.क्र.१८९/नवि-४ दि.५.३.२००२.

२) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.डिव्हीवाय ११९५/प्र.क्र.५६/नवि-४ दि.०२.०७.२०१६

३) कार्यकारी अभियंता,जा.क्र:/मु.झो.सु.म/का.अ.(शहर)उप अभि-१/७६५४/१६ दि.२९.११.२०१६

कार्यकारी अभियंता (शहर) मुंबई झोपडपट्टी सुधारणा मंडळ वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
क्र.क्र. १७२
दिनांक 5/1/17

ज्या अर्थी राज्य शासनाने नागरी दलित वस्ती सुधारणा या योजनेचे संनियंत्रण जिल्हास्तरावर करण्यास व त्याचे विनियोजन करण्याचे अधिकार जिल्हा नियोजन समिती मुंबई शहर यांना देण्यात आले आहेत. त्या अर्थी जिल्हाधिकारी मुंबई शहर यांना अशा प्रकारच्या कामाकरिता प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

**आता मी डॉ.अश्विनी जोशी, जिल्हाधिकारी मुंबई शहर जिल्हा** या आदेशाच्या परिशिष्ट "अ" नमूद केलेल्या कामांना खालील अटींवर प्रशासकीय मंजूरी देत आहे.

१) हया कामांवरील खर्च हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत २०१६-१७ मध्ये **लेखाशिर्ष "एफ-२ २२१७-नगरविकास १९१, महानगरपालिकांना सहाय्य, "(००) (२५) नागरी भागातील दलित वस्त्यामंध्ये महानगरपालिका क्षेत्रात सुविधा पुरविणे (विशेष घटक योजना)(२२१७११४१)३१, सहाय्यक अनुदान "** अंतर्गत उपलब्ध झालेल्या निधीतून करण्यात यावा.

DB/DE-II

२) **सदर प्रशासकीय मंजूरी तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे. त्यामुळे सदर कामास तांत्रिक मंजूरी घेण्याची जबाबदारी संबधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.**

३) **उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासननिर्णयातील अटी व शर्तीचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.**

४) या योजनेवर होणाऱ्या खर्चाचा हिशेब स्वतंत्रपणे ठेवण्यात येऊन या योजनेखाली बृहन्मुंबई महानगरपालिका यांना देय असलेल्या अनुदानाच्या खर्चासंबंधी उपरोक्त शासन निर्णयातील नियमांचे पालन करण्याची जबाबदारी संबधित यंत्रणेची राहील

५) या योजनेंतर्गत कामाचे वास्तुंचे बांधकाम करणेपूर्वी जागेची मालकी ज्यांच्याकडे आहे अशा सक्षम अधिका-याकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.सदर प्रमाणपत्र घेतलेले असल्याची खात्री करुनच कामास सुरुवात करावी.

६) या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या कामाचे परिरक्षण व देखभालीचे हमीपत्र संबंधीत सक्षम अधिका-याकडून घेणे आवश्यक आहे.

७) जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या मालकीच्या जागेवर त्यांच्या संबंधीत कार्यालयाच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय या कार्यक्रमातील कोणतेही काम करण्यात येऊ नये.प्रशासकीय मंजूरी दिली याचा अर्थ त्या जागेचे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे असा होत नाही याची नोंद घ्यावी.

८) या योजनेअंर्तगत घेण्यात येणाऱ्या कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, कोणत्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात येऊ नये.

९) या योजनेवर होणा-या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा.जेणेकरुन हा निधी केवळ या योजनेअंतर्गतच्या विहित प्रयोजनासाठीच खर्च होईल. तसेच कामावर झालेला खर्च वजा जाता शिल्लक रक्कम त्वरीत जिल्हाधिकारी मुंबई शहर कार्यालयाकडे वर्ग करण्यात यावी.

१०) या आदेशानुसार मंजूर करण्यात आलेली जोडपत्रातील कामे इतर कोणत्याही योजनेतून /कार्यक्रमातून घेण्यात (उदा.खासदार /आमदार स्थानिक विकास कार्यक्रम / नगर सेवक निधी /इ.) आलेली नाहीत. याची खात्री करुनच कामांना सुरुवात करावी.

११) या योजनेंतर्गत घेण्यात आलेली कामांकरिता शासन निर्णयात नमूद केलेल्या खर्चाच्या मर्यादेचे पालन होणे आवश्यक आहे.

१२) स्टॉर्म वॉटरच्या लाईनला संडासचा पाईप न जोडता तो सांडपाण्याला जोडण्यात यावा.संडासाचे बांधकाम करतांना ड्रेनेज सिस्टीम वरती संडास बांधण्यात येऊ नये.

१३) सदर कामे पूर्ण झाल्यावर त्या कामांची उपयोगिता प्रमाणपत्रे या कार्यालयास पाठविण्यात यावीत.

१४) **शासनाच्या प्रचलित नियमानुसार सक्षम अधिकाऱ्याकडून देखभाल व व परिरक्षाचे हमीपत्र घेण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रत्रेची राहील**

१५) **बांधकाम प्रकारातील कामांच्या संदर्भात काम सुरु होण्यापूर्वी, काम प्रगतीत असताना आणि काम पूर्ण झाल्या-नंतर छायाचित्रे काम पूर्णत्त्वाच्या दाखल्यासोबत कार्यान्वयीन यंत्रणेने सादर करणे आवश्यक राहील.**

**परिशिष्ट "अ"**

| अनु. क्र. | कामाची जागा व तपशिल | संदर्भ | कार्यान्वयीन यंत्रणेचे नांव | अंदाजीत खर्च रुपये | मंजूर रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| 1 | जुने आंबेडकर नगर, कुलाबा, मुंबई येथे गटारे लादीकरण व कोबा करणे. | कार्यकारी अभियंता,(शहर) मु.झो.सु.मंडळ,मुंबई यांचे पत्र क्र जा.क्र /मु.झो.सु.मं/का.अ(शहर) /उप अभि-१ /७६५४/१६ दि.२९.११.२०१६ | कार्यकारी अभियंता, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई | 1500000 | 1500000 |
| **(अक्षरी एकूण रु. पंधरा लाख फक्त./-)** | | | **एकूण** | **1500000** | **1500000** |

स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी,
यांची स्वाक्षरी असे.

स्वाक्षरीत/-
(डॉ.अश्विनी जोशी)
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती
मुंबई शहर जिल्हा

प्रत :

१) अतिरिक्त आयुक्त, (शहर) बृहन्मुंबई महानगरपलिका, मुंबई यांना माहितीसाठी रवाना
२) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,शहर विभाग यांना माहितीसाठी रवाना
३) मुख्य लेखाधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, शहर विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना
४) कार्यकारी अभियंता, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,शहर विभाग यांना पुढील कार्यवाहीसाठी रवाना
५) लेखाधिकारी नियोजन शाखा
६) कार्यालयीन नस्ती.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती
मुंबई शहर जिल्हाकरिता